2021-22

October-November-December-2021 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol.-8, Issue-4

## Recent Trends in Research






**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

October-November-December-2021 E-ISSN : 2348-7143

अ.व्या.शिक्षण संस्थेचे * लातूर महाविद्यालय, लातूर *

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol.-8, Issue-4

## Recent Trends in Research

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo :** https://indianexpress.com/article/india/narendra-modi-twitter-picture-india-100-crore-doses-covid-vaccination-7584303/

© **All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 1000/-**

E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh-** King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre -** Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende -** R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi -** North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh -** N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble -**BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath-** Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale -** Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil -** M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali -** Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil -** S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare -** Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic -** Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh -**HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar -** Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman -** Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde -** Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare -** Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game -** Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More -** BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile -** BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar-** BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare -** Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar -** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258



228

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | The Use of Symbols and Imagery in Rabindranath Tagor's Selected Short Stories | Dr. Abdul Anees Abdul Rasheed, Mrs. Kavita Kakhandki | 06 |
| 2 | Rethinking Multiculturalism : An Overview | Dr. T. M. Inamdar | 11 |
| 3 | A Study of Ambivalence in Aravind Adiga's *'Selection Day'* | Dr. N.Gunasekaran, Mrs. K.S. Shyalaja | 14 |
| 4 | Power and Solidarity in Literary Discourse | Dr. Prabhakar Hapse | 17 |
| 5 | The Myth of *Yavakri* in Girish Karnad's *'The Fire and the Rain'* | Dr. Sandeep Wagh | 20 |
| 6 | Intertextuality in Jean Rhy's *'Wide Sargasso Sea'* | Dr. Mahadev Waghmode | 23 |
| 7 | Gender Inequality in Nayantara Sahgal's *'Storm in Chandigarh'* | Dr. N. Gunasekaran, R. Santhi | 26 |
| 8 | The Role of India Tourism Development Corporation (ITDC) | Dr. Mahendra Agale | 31 |
| 9 | Rain Water Harvesting and Watershed Management of Dhora Basin in Ahmednagar District | Prof. Baban Avhad, Dr. R. D. Davankar | 35 |
| 10 | Studies on Antifungal Properties of Freshwater Fish Skin Mucus | D. K. Hiwarale | 41 |
| 11 | Impact of Covid-19 on Agriculture Sector : Study of Ahmednagar Distirct | Dr. Maruti Kekane | 45 |
| 12 | State Wise Imbalances in the Growth of Area and Production of Sugarcane Crops in India | Dr. B. S. Salunkhe | 49 |
| 13 | A Study of the Care of Reading Materials in Ratnagiri District College Libraries | Dr. Rajesh Rajam | 52 |
| 14 | Library Automation in City College Libraries of Jalgaon, Dhule and Nandurbar | Ratneshwar Bhavsar, Dr. Anil Chikate | 59 |
| 15 | A Critical Study of Performance Management in Union Bank of India, Nagpur | Dr. Sameer Kuduple | 70 |
| 16 | Pandit Nehru Pancheel, Peaceful & 21 Centure World | Dr. Pramod Sardar | 81 |
| 17 | The Impact of' Non-Verbal Communication in the Class | Dr. Balasaheb Yadav | 83 |
| 18 | A Study of Self-Confidence among Tribals and Non-Tribals College Students | Dr. J. P. Sontakke, Mr. Samadhan Patil | 89 |
| 19 | Visual Representation of the Ideal Method of Teaching in Marathi Movie 'Ubuntu' | Mr. Vaibhao Waghmare | 95 |
| 20 | Studies of Microbial Fauna on Fish Skin Mucus of Channa Punctatus (Murrel) | D. K. Hiwarale | 97 |
| 21 | Scenario of Rural Household Distribution and Household Size in Dhule District | Mr. Chaitanya Nikam, Dr. Jaydev, Dr .S. B. Patil | 102 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 22 | भारतीय आचार्यो द्वारा प्रस्तुत काव्य लक्षण | डॉ. मधुकर राठोड़ | 108 |
| 23 | 'शकुंतला' महाकाव्य में अभिव्यंजित 'भारतीय संस्कृति' | डॉ.विघ्नाथ महादू देशमुख | 113 |
| 24 | 'मंगल भवन'उपन्यास में ग्राम जीवन का चित्रण | प्रो. देविदास बामणे | 118 |
| 25 | मैत्रेयी पुष्पा के उपन्यासों में चित्रित नारी चितन | डॉ. डी. बी. महाजन | 126 |




229

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | दशम् दशक के हिंदी उपन्यासों में अस्पृश्यता | डॉ. सन्मुख मुन्छटे | 130 |
| 27 | लोकऋण उपन्यास की कथावस्तू का अनुशीलन और समस्याएँ | डॉ.देविदास बामणे | 135 |
| 28 | मनोज सोनकर के काव्य में चित्रित सामाजिक सरोकार | डॉ. ज्ञानेश्वर महाजन | 140 |
| 29 | वेदकुमार वेदालंकार : हिंदी अनुवाद में योगदान | प्रा. शुभांगी खुडे | 143 |
| 30 | मृदुला सिन्हा की कहानियों में आधुनिकतावाद | डॉ.दीपाली गुम्मे | 146 |
| 31 | हमारा संविधान हमारा सम्मान | डॉ. मीना ठाकूर | 152 |
| 32 | 'नीला आकाश'की नायिका पर अम्बेडकरवादी विचारों का प्रभाव | सायली डोळस, डॉ. मधुकर राठोड | 155 |
| 33 | जल, कृषी, स्वास्थ्य, सामाजिक जीवन, औद्योगिक क्षेत्र के विकास में पर्यावरण का प्रभाव | डॉ.मीना ठाकूर | 158 |
| | **मराठी विभाग** | | |
| 34 | उखाणा : लोकसाहित्य प्रकारातील लोकसंस्कृतीचे दर्शन | डॉ. किरण पिंगळे | 162 |
| 35 | लोकसाहित्याची सामाजिकता | डॉ. मीनाक्षी पाटील | 167 |
| 36 | मराठी-कोकणी भाषा : सांस्कृतिक परिचय | प्रा.प्राची जोशी | 171 |
| 37 | ग्रामदैवतांचे पौराणिक महत्त्व | प्रा .सुनील जाधव | 180 |
| 38 | डांगी लोकसाहित्यावर मराठी भाषेचा प्रभाव | गिरीष गायकवाड | 184 |
| 39 | संत चोखामेळा आणि संत रविदास यांच्या रचनेतील अस्पृश्यतेच्या जाणीवा | डॉ. भा. ना. गाडेकर | 187 |
| 40 | संत एकनाथांच्या भारूडांतील लोकदेवताविषयक लोकतत्त्वे | स्वाती लवंगे, डॉ. दिलीप पवार | 194 |
| 41 | भटक्यांच्या वेदनेची गाथा : बळी | डॉ. मधुकर बैकरे | 207 |
| 42 | आदिवासी कथा व आत्मकथनाची वाटचाल | डॉ. मोतीराम देशमुख | 213 |
| 43 | पहिले स्त्रीवादी आत्मकथन : *'मला उद्ध्वस्त व्हायचंय'* | डॉ. एस. पी. पैकेकरी | 218 |
| 44 | नजूबाई गावीत यांचे 'नवसा भिलणीचा एल्गार' - एक शोध' | डॉ. विजया पाटील | 221 |
| 45 | अण्णाभाऊ साठे यांचे ऐतिहासिक पोवाडे | डॉ.सुरेश पाथरकर | 227 |
| 46 | अण्णा भाऊ साठे यांचे तमाशातील योगदान | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 231 |
| 47 | कवितेचा अनुवाद | डॉ. बाळासाहेब खोमणे | 237 |
| 48 | 'मृत्युंजय' मधील कर्णचित्रण | सौ. सुषमा जाधव | 241 |
| 49 | १९७५ ते १९९० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरूप | डॉ. बिभीषण देशमुख | 248 |
| 50 | दलित कविता : असमानता आणि अत्याचाराविरुद्धचा विद्रोह हुंकार | डॉ. राष्ट्रपाल मेश्राम | 256 |
| 51 | लतिका चौधरी यांचे ललित गद्य 'गवाक्ष' : एक आकलन | डॉ. धनराज धनगर | 261 |
| 52 | महात्मा फुले : वाङ्मय आणि कार्य | डॉ. वाल्मिक आढावे | 272 |
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्वज्ञान | डॉ. जयश्री सरोदे | 277 |




230

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Vol. 8, Issue 4 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021


| | | | |
|---|---|---|---|
| 54 | ग्रामीण विकासात सहकारी क्षेत्राची भूमिका | डॉ. गोरखनाथ वाकळे | 283 |
| 55 | लाखनी तालुक्यातील मातीच्या विटा बनविणाऱ्या (मजुरांचा) कामगारांचा अभ्यास | डॉ. सुरेश बन्सपाल | 288 |
| 56 | कोविड-१९ आणि भारतीय कृषीक्षेत्र : स्वरूप व नियोजन | डॉ. विवेक चौधरी | 292 |
| 57 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य | डॉ. राजेंद्र रासकर | 296 |
| 58 | प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था | प्रा. आर. के. सूर्यवंशी | 300 |
| 59 | भारताचे परराष्ट्र धोरण आणि भारत व अमेरिका संबंध | डॉ. विमल राठोड | 303 |
| 60 | सैनिकी आणि शहरी शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये मनमोकळा, उत्तेजीतपणा, मनमौजी आणि कर्तव्यदक्षता या व्यक्तिमत्व घटकांचा अभ्यास | डॉ. दिनेश ढेंगळे | 309 |
| 61 | महाडच्या सत्याग्रहाचे लिंगभावात्मक आकलन | प्रा. किशोर काजळे | 313 |
| 62 | तबकडी भूविवतर्निकी सिद्धांताचा विषय संप्रेषणात्मक अभ्यास | डॉ. एम. पी. पगार | 318 |
| 63 | ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन आणि मनुष्यबळ विकासाच्या समस्या | प्रा. प्रज्ञा देवरे | 322 |
| 64 | मध्ययुगीन सरकार गाळणा : एक दृष्टिक्षेप | प्रा. जितेंद्र पगार | 326 |
| 65 | गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील माडिया गोंड जमातीच्या राजकीय सहभागाचे अध्ययन | डॉ. गणेश खुणे | 332 |
| 66 | 'महाराष्ट्राची परंपरा' : एक वाङ्मयीन मूल्यमापन | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 336 |


## उर्दू विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 67 | محب کوثر: بحیثیت نثر نگار<br>ہندوستان میں جدید غزل گوئی ایک سرسری جائزہ | Dr. Abdur Rahim. A Mulla | 341 |
| 68 | منشی پریم چند کا افسا نہ "کفن" کی حقیقت نگا ری پر تبصرہ- | ڈاکٹر سیّد تا ج ا لہدا محمد یو سف خطیب ، بیلگا وی - | 344 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***



231

लोकनाट्य आणि इंग्रजी नाटकावरून मराठी रूपात तयार केलेला 'फार्स' किंवा 'रंगबाजी' या साऱ्यांनी तमाशाची अंगोपांगे रूपास आणल्याचे दिसून येते."४ लोकसंस्कृतीतून तमाशा उत्क्रांत होत आला आहे. म्हणजेच काळानुसार, गरजेनुसार तमाशाच्या रूपात बदल होत आला.

गण, गौळण, लावणी, बतावणी आणि वग ही परंपरागत तमाशाची प्रमुख अंगे आहेत. प्रथम गणपतीला वंदन करून तमाशाला सुरुवात होत असे. गणानंतर गौळण सादर केली जाई. बाजाराला निघालेल्या गोपींची कृष्ण कशी छेड काढतो, याचे वर्णन या गौळणीमध्ये केले जात असे. गौळणीनंतर बतावणी आणि शेवटी वग असे या पारंपरिक तमाशाचे रूप आहे. या पारंपरिक तमाशामध्ये बोध आणि मनोरंजन या दोन्ही गोष्टी होत्या.

**सत्यशोधकी जलसे :**

महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारकार्यातून खऱ्या अर्थाने आधुनिक भारतातील प्रबोधन युगास सुरुवात झाली. सामाजिक न्यायासाठी त्यांनी ब्राह्मणी धर्मव्यवस्थेच्या विरुद्ध बंड पुकारले. बहुजन समाजाच्या मानसिक, बौद्धिक, धार्मिक आणि सामाजिक स्वातंत्र्यासाठी त्यांनी आंदोलन उभे केले. या आंदोलनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ मध्ये स्थापन केलेला 'सत्यशोधक समाज' होय. सामाजिक समतेवर आधारित नवा समाज निर्माण करण्यासाठी सत्यशोधक समाज अस्तित्वात आला. या सत्यशोधक समाजाचा म्हणजेच फुल्यांच्या विचारकार्याचा छत्रपती शाहू महाराजांवर मोठा प्रभाव होता. त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीचा त्यांच्या काळात मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार झाला. यातूनच सत्यशोधकी जलसे उदयास आले.

तमाशाचा समाज प्रबोधनासाठी वापर होऊ शकतो हे लक्षात आल्यानंतर तमाशाच्या मूळ रूपात काही महत्त्वाचे बदल करून सत्यशोधकी जलसे अस्तित्वात आले. यासंदर्भात डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, "पारंपरिक तमाशात गंभीर आणि रंजक असे दोन प्रकारचे वग असतात. यापैकी गंभीर वगातून एखादे तत्त्व प्रतिपादन केलेले असते. त्यामधून बोध केलेला असतो. रंजनही केलेले असते पण ते गौण असते. तमाशातील बोध करण्याचे आणि रंजनाचे सामर्थ्य ओळखून सामाजिक कार्य करू पाहणाऱ्या संघटना, राजकीय पक्ष, सामाजिक कार्याची तळमळ असणाऱ्या व्यक्तींनी तमाशाचा उपयोग करून घेतला. त्यात सत्यशोधकी जलसा, आंबेडकरी/संगीत जलसा, पक्षीय प्रचार करणारी कलापथके, राष्ट्रसेवादलाचे तमाशे यांचा समावेश करावा लागेल."५ तमाशातील एक बोधाचा धागा पकडून समाजप्रबोधनासाठी जलसे कसे अस्तित्वात आले, हे यावरून लक्षात येते. अर्थातच, तमाशाचा जशास तसा वापर जलसेकारांनी केला नाही. त्यात काही मूलभूत असे बदल करून त्यांनी आपले प्रबोधनाचे ध्येय साध्य केले. परंपरागत तमाशात गणातून हिंदू धर्मातील विविध देवतांना वंदन केले जात असे. सत्यशोधकी जलशामध्ये मात्र सर्वांचा निर्मिक एक म्हणून एकेश्वरवादाला वंदन केले जाऊ लागले. गणानंतर पारंपरिक तमाशात गौळण म्हटली जात असे. सत्यशोधकी जलशामध्ये मात्र ही गौळण बाद करण्यात आली. या संदर्भात डॉ. विश्वनाथ शिंदे लिहितात, "पारंपरिक तमाशात गणानंतर गौळण म्हटली जाते. सत्यशोधकी जलशाने मात्र गौळण गाळली. कारण श्रीकृष्ण हा आवतारी देव-पारंपरिक तमाशातील गौळणीत श्रीकृष्णलीलांचे चित्रण असे. अवतारवादाची कल्पना म. फुले यांनी मोडीत काढली होती. इतकेच नाही तर श्रीकृष्णावर कडवी टीका केलेली होती. त्यामुळे कृष्णाचे गुणगान करणारे गाणे सत्यशोधक जलशात शक्य नव्हते. त्याऐवजी जातीयता, स्त्रियांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न धर्माच्या नावाखाली होणारी लुबाडणूक, फसवणूक इ. विषयांवर प्रबोधन केले जाई."६ यावरून गौळण का बाद झाली हे लक्षात येते. परंपरागत तमाशात आमूलाग्र बदल करून, समाजातील अज्ञानावर, जातीयतेवर, अंधश्रद्धेवर प्रखर शब्दात घाव घालण्याचे काम जलशातून होऊ लागले.

तमाशा हा खेडूतांचा कलाप्रकार म्हणून पूर्वी प्रसिद्ध होता. समाजातील पांढरपेशा वर्ग तमाशाला कमी लेखत असे. परंतु लोकजीवनामध्ये मात्र तमाशा लोकप्रिय होता. तमाशातील गौळणीमधून येणारे अश्लील संवाद तमाशाला बदनाम करीत होते. अशा तमाशात सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि शाहिरी कवितेचे खरे रूप शोधण्यासाठी १९४८ मध्ये द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली 'तमाशा सुधार समिती' स्थापन करण्यात आली. तमाशात सुधारणा करू पाहणाऱ्या तत्कालीन सरकारने अण्णा भाऊ साठेंच्या प्रयोगशील तमाशावर, बंदी घातली.

तमाशातील प्रबोधनाचे सामर्थ्य ओळखून अण्णा भाऊ साठेंनी तमाशाला 'महाराष्ट्राचा राष्ट्रीय कलाप्रकार' म्हणून संबोधले आहे. महाराष्ट्राची कला क्षेत्रातील ओळख म्हणून मराठी माणसाने तमाशाला जपले पाहिजे, त्याला बदनामीपासून वाचविले पाहिजे, असे अण्णाभाऊंना वाटते. अर्थातच तमाशा हा अण्णा

भाऊ साठे यांना महाराष्ट्राचा प्राण वाटतो. त्यामुळेच त्यांनी तमाशातील लोककलावंतांचे प्रश्न मांडण्यासाठी 'वैजयंता' ही कादंबरी लिहिली. तमाशात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक नवे प्रयोग करून तमाशाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. आयुष्यभर त्यांनी तमाशावर प्रेम केले.

**अण्णा भाऊ आणि तमाशा :**

बालपणापासूनच अण्णा भाऊ साठे तमाशा कलाप्रकाराशी परिचित होते. ते लहान असताना तमाशात काम करणाऱ्या आपल्या मावस भावासोबत तमाशाला जात असत. त्यामुळे नंतरच्या काळात ते तमाशाकडे वळले. लोकप्रबोधनाचे साधन म्हणून ते तमाशाकडे पाहतात.

अण्णा भाऊ साठे हे जसे उत्तम प्रतिभा असणारे लेखक आहेत, तसेच ते अत्यंत हुन्नरबाज लोककलावंत आहेत. यामुळेच त्यांनी तमाशाची खरी ताकद ओळखून समाजप्रबोधनाचे काम सुरू केले. लोकचळवळ उभी करण्याचे एक उत्तम माध्यम म्हणून त्यांनी तमाशाकडे पाहिले. शिकलेला माणूस कथा, कादंबरी वाचू शकतो. अशिक्षित माणसाचे प्रबोधन करावयाचे असेल तर तमाशासारखे दुसरे साधन नाही, याची जाणीव अण्णाभाऊंना होती. लोकप्रबोधनासाठी त्यांनी तमाशामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला. तमाशाला समाजाभिमुख रूप देण्यात त्यांना यश आले.

अण्णा भाऊ साठे यांचे तमाशावर नितांत प्रेम आहे. त्यामुळेच त्यांनी तमाशातील उपेक्षित कलावंतांच्या जीवनावर 'वैजयंता' ही प्रसिद्ध कादंबरी लिहिली. या कादंबरीच्या मनोगतामध्ये त्यांनी तमाशाला 'महाराष्ट्राचा राष्ट्रीय कलाप्रकार' म्हटले आहे. अर्थातच तमाशा ही अण्णा भाऊंना महाराष्ट्राची कलाक्षेत्रातील ओळख वाटते. अशा या तमाशाला सामाजिक बदनामीपासून वाचवले पाहिजे, त्यात सुधारणा घडवून आणली पाहिजे असे त्यांना मनापासून वाटते.

**लोकनाट्य :**

परंपरागत तमाशात शृंगार रसाला आणि नाच्या-नाचीला महत्त्व दिल्यामुळे तो स्वतःला प्रतिष्ठित समजणाऱ्या लोकांना आवडत नसे. तमाशा म्हणजे अडाणी लोकांचा कलाप्रकार अशी उच्चवर्णीय लोकांची समजूत झाली होती. अशा परिस्थितीतून तमाशाला बाहेर काढणे आवश्यक होते. या बदनाम झालेल्या तमाशात सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारने १९४८ मध्ये एक 'तमाशा सुधार समिती'ही नेमली होती. एका बाजूला शासनाने तमाशा सुधार समिती नेमली तर दुसऱ्या बाजूला अण्णा भाऊ साठे यांच्या तमाशावर करडी नजर ठेवली. अण्णाभाऊंच्या शाहिरी काव्यातून आणि तमाशातून शेतकरी, कामगार वर्ग जागृत होऊ लागला होता. शोषित वर्ग संघटित आणि जागृत होणे प्रस्थापित व्यवस्थेला कधीही रुचत नाही. कॉ. एस. ए. डांगे यांनी अण्णाभाऊंच्या 'शाहीर' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत यासंदर्भात महत्त्वाची माहिती दिली आहे. ते म्हणतात, "अण्णा भाऊ आणि त्यांचे साथी अमर शेख, गव्हाणकर आणि इतर मंडळी यांच्या काव्यकृती, पोवाडे, लावण्या, गाणी, तसेच त्यांचे तमाशे व नाटके गेली पांच-सहा वर्षे महाराष्ट्रापुढे आहेत. त्यांच्या



234

E-ISSN :
2348-7143
Oct-Dec 2021

तमाशावर तर सरकारची करडी नजर पडून ते बंदही पाडण्यात आले. एवढेच नव्हे, तर कऱ्हाडमध्ये त्यांचे पथक तमाशा करायला गेले असता त्या सर्व पथकाला अटक करून विनाचौकशी कित्येक महिने तुरुंगातही डांबून ठेवण्यात आले. पुढे काही दिवस अण्णा भाऊंना भूमिगत राहावे लागले. तर त्यांचे साथी अमर शेख व गव्हाणकर नाशिक जेलमध्ये लाठीमार-गोळीबाराच्या हल्ल्यांत तावूनसुलाखून बाहेर पडले."७ यावरून तत्कालीन सरकारने शोषितांचा लढा दडपण्याचा कसा प्रयत्न केला हे लक्षात येते. सरकारने तमाशावर घातलेल्या बंदीतून मार्ग काढण्यासाठी अण्णा भाऊ साठे यांनी लोकनाट्यांची निर्मिती केली. ही निर्मिती करताना त्यांनी परंपरागत तमाशात काही बदल केले आहेत.

अण्णा भाऊ साठे हे 'लोकनाट्य' या शब्दाचे जनक मानले जातात. याचे कारण म्हणजे त्यांनी तमाशाचे 'लोकनाट्य' असे केलेले नामांतर होय. तमाशाचे लोकनाट्य कसे झाले, हे सांगताना पां. तु. पाटणकर लिहितात, "लोकनाट्य हा तमाशाचा आधुनिक अवतार. 'लोकनाट्य' ह्या शब्दाचे जन्मकर्तृत्व मात्र अण्णाभाऊंकडे गमतीदार योगायोगाने आले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आधीचे दिवस होते ते. महाराष्ट्रापासून मुंबई तोडून ती गुजरातच्या पारड्यात टाकण्यासाठी किंवा स्वतंत्र ठेवण्यासाठी महाराष्ट्रद्वेष्ट्या राजकारण्यांची तेव्हा जोरात खटपट चालली होती. अण्णा भाऊ तेव्हा 'लालबावटा कलापथाका'द्वारे आपल्या लेखणीचे फटकारे अशा संधीसाधू, भोंदू व स्वार्थी राजकारण्यांवर व मुंबई शासनावर ओढीत होते. त्यामुळे चिडून जाऊन मोरारजी देसाई यांनी त्यांच्या कलापथकावर व तमाशावर बंदी आणली. अण्णाभाऊंनी डोके लढवले. त्यांनी 'माझी मुंबई' हा वग लाखो कामगारांसमोर सादर केला व सुरुवातीला स्टेजवरून जाहीर केले की, "मायबाप सरकारने तमाशावर बंदी आणली आहे; म्हणून आज आम्ही आपल्यासमोर 'माझी मुंबई' हे लोकनाट्य सादर करीत आहोत." टाळ्यांच्या कडकडाटात व पोलिसांच्या उपस्थितीत तमाशाचे 'लोकनाट्य' असे बारसे करण्याचे एक ऐतिहासिक कार्य अण्णाभाऊंनी केले व आपल्या मिस्कीलपणाने त्यांनी शासनाला हात चोळीत बसायला लावले!"८ असे तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर झाल्यानंतर अण्णा भाऊंनी लोकनाट्याला अत्यंत कमी कालावधीतच प्रसिद्धी मिळवून दिली.

पारंपरिक तमाशामध्ये प्रारंभी गणात गणपतीला आणि विविध प्रकारच्या देव-देवतांना वंदन करून तमाशाला सुरुवात होत असे. यात बदल करून अण्णाभाऊंनी महापुरुषांना वंदन करण्याची नवी पद्धत अस्तित्वात आणली. पेशवाईमध्ये मोठ्या प्रमाणात गणपतीपूजन केले जात असे. या पेशवाईतील वातावरणाचा परिणाम तमाशावरही झाला. त्यामुळे गणपतीच्या गुणगौरवाने तमाशाला प्रारंभ करण्याची पद्धत अस्तित्वात आली. देवा-धर्माचा वापर प्रस्थापितांनी नेहमी बहुजन समाजाला गुलामीत ठेवण्यासाठी केला आहे. म्हणून अण्णा भाऊ 'परंपरागत गणा'तील देव-देवता नाकारतात. त्याऐवजी शोषितांना प्रेरणा देणारे महापुरुष, शूरवीर हे अण्णा भाऊंच्या गणाचे विषय बनले आहेत. यादृष्टीने त्यांनी लिहिलेला पुढील गण महत्त्वाचा आहे.

"प्रथम मायभूच्या चरणा
छत्रपती शिवबा चरणा
स्मरोनि गातो | कवना ||धृ||
स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क करुनिया गर्जना
लोक उठविला जागा केला त्या लोकमान्यांना
कठिण काळि राष्ट्रनौकांना
मार्ग दाखवीला तयांना
देशा दिली ज्यांनी प्रेरणा ||१||
क्रांतिकारि वीरांना आणि त्यागी हुतात्म्यांना
देशासाठी देह झिजविला त्या नररत्नांना
महाराष्ट्र भूच्या भूषणा |



२३५

पणा लावुनीया प्राणा ।
अर्पियले ज्यांनी जीवना ॥२॥
आठवून मनीं ही शुभनामें करुनिया स्तवना
आशिर्वाद मागतों आम्ही गावया कवना
सभापती आणि सुजनां
कलावंत आणि रसिकांना
स्फूर्ति द्यावि हीच प्रार्थना"९

सत्यशोधक जलशामध्ये गणात निर्मिकाला वंदन करण्याची पद्धत होती. अण्णा भाऊ मात्र मातृभूमीला, महापुरुषाला आणि शूरवीरांना अभिवादन करून आपल्या प्रबोधनाला प्रारंभ करतात. एकूणच, हा गणाच्या आशयात झालेला बदल म्हणजे त्यांच्या क्रांतिकारी दृष्टीचाच परिणाम होय.

तमाशात गणानंतर गौळण सादर केली जात असे. या गौळणीमध्ये अश्लील संवाद असत. कृष्ण आणि गवळणी यांच्यातल्या संवादातून ही अश्लीलता व्यक्त होत असे. त्यामुळे अण्णाभाऊंनी ही 'गौळण' तमाशातून वगळली. त्याचबरोबर तमाशातील 'वग' लोकशिक्षणासाठी वापरला. अण्णाभाऊंच्या या नावीन्यपूर्ण दृष्टीमुळे तमाशाचे रूपच बदलून गेले. म्हणून डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, "परंपरागत तमाशाची सुरावट घेऊन अण्णाभाऊंनी शाहिरीची नवी सजावट केली. या अर्थाने, की पोवाडे, लावण्या, गीते, गण, वग इत्यादी रचनाबंध त्यांनी स्वीकारले, परंतु त्यात नवा आशय भरला. हा नवा आशय समकालीन होता, वास्तवाधिष्ठित होता, तसाच भविष्यदर्शीही होता. जेव्हा परंपरागत रचनाबंधात नवा अन्वर्थक आशय भरला जातो तेव्हा त्या रचनाबंधालाही नवेपण येते आणि त्यालाच प्रतिष्ठा प्राप्त होते. केशवसुतांनी अभंगरचना केली. गोविंदाग्रजांनी अनामिकाचे अभंग लिहिले. माधव ज्यूलियनांनी फटकळ अभंग लिहिले. मर्ढेकरांनीही अभंग, ओवी या रचनाबंधाचा स्वीकार केला. परंतु या सर्वांनी त्यात समकालीन नवा आशय भरला. हा उल्लेख जाणीवपूर्वक केला अशासाठी, की अण्णाभाऊंनी शाहिरी काव्याची परंपरा स्वीकारली तरी शाहिरी कवनात म्हणजे पोवाडे, लावण्या, गीते, गण इत्यादीत आणि वगात त्यांनी नवा आशय भरला. त्यामुळे या परंपरागत कलेला नवी प्रतिष्ठा मिळाली. शाहिरीची ही नवी सजावट 'लोकनाट्य' या अर्थपूर्ण नावाने ओळखली गेली."१० यावरून अण्णाभाऊंना वर्तमानाचे कसे भान होते हे तर लक्षात येतेच. त्याचबरोबर एखादी कला कालानुरूप कशी वापरावी किंवा त्या कलाप्रकाराला समकालीन वास्तवाचे परिमाण कसे प्राप्त करून द्यावेत हेही लक्षात येते. एकूणच, एक शाहीर म्हणून अण्णा भाऊ साठे यांनी तमाशात केलेले बदल अत्यंत क्रांतिकारी आहेत. गणाच्या आशयात केलेला बदल, गौळणीला दिलेला फाटा आणि वगातून केलेले समाजप्रबोधन लक्षणीय आहे. परंपरागत तमाशातील रंजकता कमी करून समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असणाऱ्या बंडखोर जाणिवा त्यांनी लोकनाट्यातून व्यक्त केल्या आहेत.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लोकनाट्यातून सामाजिक प्रबोधनाला महत्त्व दिले आहे. शोषित, पीडित वर्गाला आपल्या हक्क-अधिकाराच्या संदर्भात जागे करण्याचा ते प्रयत्न करतात. सामाजिक आणि आर्थिक शोषणाविरुद्ध लढण्याचे आवाहन त्यांनी अनेक लोकनाट्यातून केले आहे. हे सर्व करत असताना त्यांनी मूळ विषय अधिकाधिक रंजक कसा राहील याकडेही लक्ष दिले आहे. त्यांनी आपल्या लोकनाट्याना दिलेल्या शीर्षकातूनही ही गोष्ट लक्षात येते. मनोरंजक शैलीतून एखादा विषय प्रेक्षकांसमोर मांडणे आणि प्रबोधन घडवून आणणे हा त्यांच्या साहित्यनिर्मितीचा प्रमुख उद्देश आहे. अर्थातच, समाजजागृती हे त्यांच्या लेखनाचे ध्येय असले तरी विषयाच्या मांडणीमध्ये, अभिव्यक्तीमध्ये रंजकता दिसून येते. सामान्य माणूस हा त्यांच्या



236

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 8, Issue 4 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

लोकनाट्याचा विषय आहे. त्यामुळे लोकनाट्याची भाषाही साधी सरळ, प्रासादिक आहे. एकूणच, मनोरंजन हे माध्यम आणि समाजप्रबोधन हे ध्येय असे सूत्र त्यांच्या लोकनाट्यात दिसून येते.

समाजाची प्रबोधनाची गरज लक्षात घेऊन अण्णा भाऊ साठे यांनी परंपरागत तमाशात अमुलाग्र बदल घडवून आणला. तमाशाला प्रतिष्ठा मिळवून दिली. एकूणच तमाशा ते लोकनाट्य हा अण्णा भाऊंचा प्रवास मराठी लोककलेला समृद्ध करणारा आहे.

**संदर्भ सूची :**

१. जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र. सं.): मराठी विश्वकोश, म. रा. सा. सं. मंडळ मुंबई, प्रथम प्रकाशन १९७७, खंड ७, पृ. १५७, १५८.
२. शिंदे विश्वनाथ : शाहिरी वाङ्मयाच्या धारा, प्रतिमा प्रकाशन पुणे, प. आ. १९९६, पृ. २७.
३. तत्रैव, पृ. २७.
४. जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र. सं.): मराठी विश्वकोश, उनि. पृ. १५८
५. शिंदे विश्वनाथ : शाहिरी वाङ्मयाच्या धारा, उनि. पृ. १०४.
६. तत्रैव, पृ. १०६.
७. गायकवाड आसाराम (सं) : लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णाभाऊ साठे संदर्भ ग्रंथ, झेप प्रकाशन नाशिक, प. आ. १९९६, पृ. ३८.
८. गंधे दिवाकर (सं.) : लोकराज्य : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विशेषांक, १ नोव्हेंबर १९९३, पृ. ३५-३६.
९. साठे अण्णाभाऊ : शाहीर, मनोविकास प्रकाशन मुंबई, प. आ. १९५२, पृ. १७.
१०. गायकवाड आसाराम (सं) : लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे संदर्भ ग्रंथ, उनि. पृ. ८२-८३.

Principal
A.V.Education Society
Degloor College Degloor